जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2024
पुण्यनगरी



कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे निधी सुपूर्द करताना विजया भोसले.

# डॉ. भोसले स्मृती पारितोषिकासाठी देणगी

**कोल्हापूर :** जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. राजाराम विष्णू तथा आर. व्ही. भोसले यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शैक्षणिक पारितोषिक देण्यासाठी त्यांच्या पत्नी विजया भोसले यांनी शिवाजी विद्यापीठास दीड लाख रुपयांची देणगी दिली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे त्यांनी धनादेश सुपूर्द केला. शिवाजी विद्यापीठाच्या खगोलशास्त्र विभागाचे माजी प्रमुख असलेल्या डॉ. भोसले यांचे सन २०२० मध्ये वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे खगोलशास्त्रातील संशोधन जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त होते. भारताचा पहिला रेडिओस्कोप तयार करण्याची कामगिरी त्यांच्या नावावर आहे. शिवाजी विद्यापीठाचे पन्हाळा येथे अवकाश संशोधन केंद्र व्हावे, यासाठी डॉ. भोसले यांचा पाठपुरावा महत्त्वाचा ठरला. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह प्राचार्य शशिकांत शिंदे, पंजाबराव भोसले, डॉ. विजय मारुलकर आणि शिवप्रकाश भोसले उपस्थित होते.

0 6 SEP 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) शिक्षक दिनाच्या कुलगुरू शिर्के यांना शुभेच्छा देताना 'यिन'चे गृह राज्यमंत्री शिवतेज देवणे. शेजारी यिन सहायक व्यवस्थापक (पश्चिम महाराष्ट्र) अवधूत गायकवाड, यिन अध्यक्ष वैभव कोतेकर, यिन प्रतिनिधी मोहन मोरे, प्रीती जगताप, सानिया सनदी, अक्षता गोखले, दीक्षा देसाई, क्षितिजा उबाळे, साक्षी वाघमारे, पृथ्वीराज काळे, समीर शेख, अल्फिया सय्यद, अभिषेक सूर्यवंशी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात भगवान चक्रधर स्वामी जयंती उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

भगवान चक्रधर स्वामी यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते भगवान चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एम. गुरव, डॉ. एन. एच. नदाफ, पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. व्ही. मोहळकर, एन. एस. नाईक, एच. बी. कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2024
सकाळ

# भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींना विद्यापीठात अभिवादन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांची जयंती शिवाजी विद्यापीठात आज उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते भगवान सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एम. गुरव, डॉ. एन. एच. नदाफ, पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. व्ही. मोहळकर, एन. एम. नाईक, एच. बी. कांबळे उपस्थित होते.

0 6 SEP 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थार्जनासह विधायक कार्यासाठीच समाज माध्यम

## डॉ. व्ही. एन. शिंदे : विद्यापीठात यू ट्यूबसंदर्भात कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आयुष्यभर विद्यार्थी बनून तंत्रज्ञानाशी जुळवून घ्या, शिका, लक्षात ठेवा, आठवा व त्याचा वापर समाज माध्यमांसाठी करा आणि अर्थार्जनाचा स्त्रोत निर्माण करा; पण या माध्यमांच्या अंतिम वापर हा विधायक कार्यासाठी करावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.



**कोल्हापूर : कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तृप्ती करेकट्टी आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये पीएम उषा योजनेंतर्गत वि. स. खांडेकर भाषा भवन येथे 'यू ट्यूब चॅनल : निर्माण, उपयोग, रोजगार' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले.

पहिल्या सत्रात विषयतज्ज्ञ विष्णू वजार्डे म्हणाले, या क्षेत्रात शॉर्टकट चालत नाही. सध्या अनेक संधी खुल्या झाल्या आहेत. शिक्षण घेत असतानाही आपण यू ट्यूब चॅनलच्या माध्यममातून अर्थाजन करू शकता. दुसऱ्या सत्रात माध्यम तज्ज्ञ डॉ. शिवाजी जाधव म्हणाले, यू ट्यूब व्हिडीओ बनवताना कंटेंट खूप महत्त्वाचा आहे. कारण डिजिटल मीडियामध्ये कंटेंट हा किंग असतो.

सूत्रसंचालन डॉ. सुषमा चौगुले यांनी केले. यावेळी डॉ. अक्षय भोसले, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. रमेश खबाले, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ सुवर्णा गावडे, डॉ. भाग्यश्री पुजारी यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2024
लोकमत

# पीडितेने न घाबरता तक्रारीसाठी पुढे यावे

## मंगला पाटील : 'जर्नालिझम'मध्ये शिक्षकदिन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महिलांसाठी अनेक कायदे आहेत, या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पीडित महिलेने कोणालाही न घाबरता पुढे येऊन तक्रार दिली पाहिजे, असे मत भारती विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. मंगला पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभागात शिक्षक दिनानिमित्त 'महिलांविरोधातील हिंसाचार आणि कायदे' या विषयावर त्या बोलत होत्या. प्रा. डॉ. निशा पवार यांनी स्वागत केले.



डॉ. मंगला पाटील म्हणाल्या, समाजाने पीडितेच्या मागे उभे राहायला हवे. पीडितांना समर्थन मिळाल्यास ती नक्कीच तक्रार करायला पुढे येईल. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी जयप्रकाश पाटील आणि डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 6 SEP 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पीडितेने न घाबरता तक्रारीसाठी पुढे यावे

## डॉ. मंगला पाटील; जर्नालिझम विभागात शिक्षक दिन उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महिलांसाठी अनेक कायदे आहेत. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पीडित महिलेने कोणालाही न घाबरता पुढे येऊन तक्रार दिली पाहिजे, असे भारती विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. मंगला पाटील म्हणाल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागात शिक्षक दिनानिमित्त 'महिलांविरोधातील हिंसाचार आणि कायदे' या विषयावर त्या बोलत होत्या. डॉ. पाटील म्हणाल्या, अत्याचारग्रस्त महिला किंवा मुलीने तक्रार देण्यास पुढे येण्यासाठी समाजात चांगले वातावरण



**कोल्हापूर : विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. मंगला पाटील.**

हवे. पीडितांना समर्थन मिळाल्यास ती नक्कीच तक्रार करायला पुढे येईल. महिलांसाठी अनेक कठोर कायदे आहेत. परंतु तक्रारीअभावी महिलांच्या विरोधात अत्याचार होत असूनही दोषी मोकाट राहतात. पोलिस तपासात कमी राहता कामा नये. महिलांवर अत्याचार केल्यानंतर जबरी शिक्षा होते असा संदेश जायला हवा. यासाठी जलद गतीने न्याय प्रक्रिया राबववी, असेही डॉ. पाटील यांनी नमूद केले.

मुलांवरील अत्याचारासंदर्भात अलीकडे आलेला पोक्सो कायदाही महत्त्वाचा आहे. नुसते कठोर कायदे करून चालत नाही तर त्याच्या अंमलबजावणीसाठी तसे समाजभानही असायला हवे. कायद्यांचे शिक्षण व जनजागृतीतून समाजात बदल घडवणे शक्य आहे, असेही त्या म्हणाल्या. प्रा. डॉ. निशा पवार यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले. यावेळी जयप्रकाश पाटील व डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होते.

06 SEP 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना 'कॅरी ऑन' करण्यास मान्यता

## शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाचे जवळपास १ हजार ६०० विद्यार्थी प्रथम वर्षात अनुत्तीर्ण झाले आहेत. यासंदर्भात विद्यार्थ्यांनी कुलगुरूंची भेट घेवून कॅरी ऑन करण्याची विनंती केली होती. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेवून समिती नेमली असून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना कॅरी ऑन करण्याचा सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णयाला विद्या परिषदेने मान्यता दिली आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले तर एक वर्ष वाया जाणार आहे. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जावू नये म्हणून नवीन शैक्षणिक धोरणात कॅरी ऑन करण्याची तरतूद आहे. याचा विचार करूने अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना दोन वर्षासाठी कॅरी ऑन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्या परिषदेने सकारात्मक निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांनी मात्र



पुढच्या वर्गान बसून पाठीमागच्या वर्गातील विषय सोडवणे बंधनकारक आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क वाचणारच व एक वर्षही वाया जाणार नाही. या निर्णयाचे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून स्वागत होत आहे. परीक्षेचे आयोजन, नियोजन, मूल्यमापन महाविद्यालयाकडे द्यावे, असे पत्र प्राचार्य संघटनेने कुलगुरूंना दिले होते. यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी समितीची स्थापना केली आहे. परंतु शैक्षणिक गुणवत्ता टिकवण्यासाठी विद्यापीठाने परीक्षा घेणे उचित असल्याचेही मत अनेकांनी व्यक्त केले. पर्यावरण संरक्षणासाठी 'एक विद्यार्थी एक वृक्ष' हा अहवाल मंजूर करून झाड जगवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल, असे सांगण्यात आले. नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, नूतनीकरणाला मान्यता देण्यात आली.

विद्यापीठ अंतर्गत पीएच.डी. च्या नियमातील सुधारणा मान्य केल्या. संजीवन ग्रुप इन्स्टिट्यूट ऑफ पन्हाळा या नावाला मान्यता देण्यात आली. सांगली येथील कडेगावातील भारती विद्यापीठ अंतर्गत कन्या महाविद्यालयाला कोएज्युकेशनसाठी मान्यता. युजीसीच्या स्वयं पोर्टल फ्रेमवर्कला मान्यता. तसेच राज्यशास्त्र विभागात सर्टीफिकेट कोर्स इन पॉलिटिकल लिस्ट्सी आणि कॉमर्स विभागाच्या डिप्लोमा इन प्रोसेस सेफ्टी मॅनेजमेंट या दोन नवीन अभ्यासक्रमांना मान्यता. कॉमर्स आणि व्यवस्थापनच्या विद्यार्थ्यांना एमबीए थेट व्दितीय वर्षात प्रवेश देण्यास मान्यता. यासह ३४ विषयांवर मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 SEP 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज महिला सन्मान परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभाग आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.६) वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये महिला सन्मान परिषद आयोजित केली आहे. परिषदेत पुणे येथील मिलिंद चव्हाण 'लैंगिक हिंसा, सत्ता आणि वर्चस्व', ॲड. रमा सरोदे 'लैंगिक हिंसा, कायदा व आपली जबाबदारी' तर आरती नाईक 'निकोप समाज व्यवस्था आणि पुरुषभान' या विषयांवर संवाद साधणार आहेत. सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. शिवाजी जाधव, डॉ. नंदकुमार मोरे व अंनिस कोल्हापूरचे अध्यक्ष डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले आहे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 6 SEP 2024
लोकमत

# केरळच्या स्वच्छतादूत



## भवताल

डॉ. रसिया पडळकर

**हरितकर्म सेनेच्या महिला, समुदायाची बांधीलकी, स्वयंसेवी संस्था आणि या सगळ्याला सरकारचा असणारा सक्षम-भ्रष्टाचारमुक्त पाठिंबा या सूत्रामुळे केरळमध्ये स्वच्छ शहरे आणि ग्रामीण भाग अनुभवायला मिळतो.**

गोष्ट फार लांबची नाही आणि जुनी तर अजिबात नाही. आजच्या काळात घडणारी, वर्तमानातील समाज-वैज्ञानिक प्रश्नांना भिडणारी आणि वर्तमानातील तंत्रज्ञान, मानवी संसाधने आणि सामुदायिक जबाबदारीच्या भावनेतून प्रश्न सोडवू बघणारी. निसर्गरक्षणासाठी ठामपणे उभ्या राहणाऱ्या स्त्रियांना जेव्हा जबाबदारी दिली जाते त्यावेळी निसर्ग निर्माणासाठीदेखील तितक्याच समर्थपणे त्या उभ्या राहतात आणि अगदी साध्या-साध्या महिला पर्यावरणाचे अक्राळ-विक्राळ होऊ घातलेले प्रश्न नेटाने सोडवतात. त्याचीच ही गोष्ट.

शहरे, उपनगरे आणि अगदी ग्रामीण भागातदेखील घनकचरा व्यवस्थापन हा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. रस्त्यावरून चालताना आजूबाजूला साठलेले कचऱ्याचे ढीग, पावसाळ्यात पावसाच्या पाण्याबरोबर वाहत येणारा कचरा, कचरा डेपोमध्ये साठलेले कचऱ्याचे प्रचंड डोंगर आणि त्यातून होणारे भूजल, हवा, पाणी या सगळ्याचे प्रदूषण. हे सगळे किळसवाणे वास्तव आपण प्रत्येक शहरात अनुभवतो आहोत. अर्थात नंबरच लावायचा झाला तर कोल्हापूर शहराचा या ओंगळवाण्या वास्तवात नक्कीच पहिला नंबर येईल, यात शंका नाही.

जशी कचऱ्याची निर्मिती वाढत जाते तशी या वाढलेल्या कचऱ्याची प्रशासनाने आणि यंत्रणेने योग्य वेळी दखल घेणं आणि त्याच्या व्यवस्थापनासाठी प्रामाणिक प्रयत्न करणं गरजेचं असतं. ते न झाल्यास काय होतं ते आपण आज अनुभवतो आहोतच.

पण ही परिस्थिती बदलता येऊ शकते, हे केरळसारख्या राज्याने दाखवून दिलेले आहे. तेदेखील अत्यंत शिस्तशीर, पर्यावरणपूरक, अर्थव्यवस्थेला गती देणाऱ्या आणि महिलांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या मार्गाने. केरळमधील या उपक्रमाचे नाव आहे, 'हरित केरळा मिशन' आणि हे घडवून आणणाऱ्या महिलांच्या टीमचे नाव आहे, हरितकर्म सेना! विकेंद्रित पद्धतीने घन कचऱ्याचे व्यवस्थापन करणे, अ-विघटनशील कचऱ्याचे योग्य पद्धतीने वर्गीकरण करून त्याची पुनर्वापरासाठी विक्री करणे, विघटनशील कचऱ्याचे कंपोस्ट खत तयार करणे आणि या सर्वांमधून निर्माण झालेल्या महसुलातून हरितकर्म सेनेच्या महिलांचा रोजगार आणि त्यांच्या अर्थार्जनाचे व्यवस्थापन करणे, असे हे मॉडेल आहे. केरळमधील 'आल्लेपी' या शहरात २०१६ साली सुरू झालेल्या या मॉडेलची, आता संपूर्ण केरळ राज्यात अंमलबजावणी केली जाते.

आज, केरळच्या प्रत्येक शहरात कमी-जास्त संख्येने असणारी महिलांची ही टीम, घरोघरी जाऊन कचरा गोळा करते. नागरिक ओला आणि सुका कचऱ्याचे वर्गीकरण करूनच कचरा या महिलांकडे देतात. या सुविधेच्या बदल्यात प्रत्येक घरातून महिना ४० ते १०० रुपये गोळा केले जातात. गोळा केलेला हा कचरा जवळच्या मटेरिअल कलेक्शन फॅसिलिटी सेंटरला जमा केला जातो, तिथे त्याचे प्राथमिक वर्गीकरण करून तो पुढील सेंटरला पाठवला जातो. या महिला अ-विघटनशील कचऱ्याचे ११ प्रकारे वर्गीकरण करतात आणि महापालिकेने ठरवून दिलेल्या व्हेंडरकडे या प्लास्टिकची विक्री करतात. या विक्रीतून येणारी सर्व रक्कम एकत्रित करून महिन्याच्या शेवटी सर्व महिलांचे पगार केले जातात. यासाठी लागणारी सर्व मशिनरी आणि जागा ही शासनामार्फत पुरवली जाते. महिलांना व्यक्तिगत सुरक्षेची साधने पुरवली जातात, ती त्यांनी वापरावीत यासंदर्भात त्यांचे प्रशिक्षण घेणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे ही सर्व जबाबदारी शासनाने घेतलेली असते. हरितकर्म सेनेच्या महिला, समुदायाची बांधीलकी, स्वयंसेवी संस्था आणि या सगळ्याला शासन आणि सरकारचा असणारा सक्षम-भ्रष्टाचारमुक्त पाठिंबा या सूत्रामुळे आज केरळमध्ये तुम्ही कुठेही फिरा तुम्हाला अत्यंत स्वच्छ शहरे आणि ग्रामीण भाग अनुभवायला मिळतो.

भारतातल्याच केरळसारख्या राज्यात जर हे घडू शकते तर आपल्याकडे का नाही, हा प्रश्न आपण स्वतःला, आपल्या शासनाला आणि राज्यकर्त्यांना विचारायला हवा. की आपल्याला कचऱ्यात राहायला आवडू लागलेले आहे?

